# प्रा. श्रीराम पुजारी यांनी पुण्यात संगीतावरील दिलेली तीन व्याख्याने

स्थळ : साधना साप्ताहिक, शनिवार पेठ, पुणे.

**व्याख्यान १**

दिनांक : १४.८.२००४

## माझ्या संगीतश्रवणभक्तीचा प्रवास

रसिक श्रोतेहो, आजपासून तीन दिवस, मी माझा हिन्दुस्थानी संगीत ऐकणारा म्हणून - एक श्रोता, डोळस श्रोता - म्हणून कसा प्रवास झाला ते सारं चित्र आपल्यासमोर उलगडून सांगणार आहे. मी संगीताचा व्याकरणकार नाही हे प्रथम आपण लक्षात घ्या. भारतीय शास्त्रीय संगीतात व्याकरणकार आणि कलाकार असे वर्ग दिसतात. कलाकार व्याकरणकार नसतात असे मी म्हणत नाही. पण मी व्याकरणकारांतला नाही. गेली जवळजवळ सत्तर वर्षं मी गाणं ऐकत आलेलो आहे. बुद्धी शुद्ध ठेवून, कुठल्याही प्रकारच्या रंगामधे स्वत:ला न मिसळता मी गाणं ऐकत आलेलो आहे. आज गाणाऱ्यांची जशी घराणी आहेत, तशीच ऐकणाऱ्यांची घराणी झालेली आहेत. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. 'आम्ही अमक्या घराण्याचंच गाणं ऐकतो'असं अभिमानानं सांगणारे श्रोते आहेत. हे बरोबर नाही.

या गाणं ऐकण्याचा माझा प्रवास समजून घेण्यासाठी माझं बालपण, शिक्षण, घरची स्थिती, आमची त्यावेळची आर्थिक स्थिती हे सारं समजूण घेणं आवश्यक आहे. आमच्या घरात तसं गाणं ऐकायला जाणं नव्हतं. प्रेमानं गाणं ऐकायला जाणारा कोणीही नव्हता. गाण्याविषयी, आमच्या घरात तिरस्काराचीच भावना होती. माझा जन्म पंचवीस जुलै १९२५ सालचा. माझ्या वयाचे जे असतील ते समजू शकतील की, त्या काळात गाणं म्हणणं हे मध्यमवर्गीय ब्राह्मणांच्या घरात 'तवायफी' समजलं जायचं. मोठ्या माणसांच्या समोर गाणं गुणगुणणं, त्यांचा अपमान करण्यासारखं होतं. त्यावेळचे वडील आजच्या काळातल्यासारखे मायाळू, प्लास्टिकचे नव्हते. घरात वडिलांचा आणि उर्वरित शाळेतल्या वेळात मास्तरांचा असा दुहेरी मार खायचा तो काळ होता. माझे वडील भिक्षुक होते. ते फार सुरेख मंत्र म्हणायचे. ते मंत्र ऐकण्याचा मला छंद होता. ते मंत्र ऐकताना त्या स्वरांतून माझं गाणं ऐकण्याचं पहिलं शिक्षण झालं. मीही त्यांचेबरोबर मंत्र म्हणत असे. मी घरामध्ये थोडा उनाड होतो. घरातलं धार्मिक वातावरण वयाच्या सातव्या आठव्या वर्षापासून उधळून लावलेला. - पण कानावर काही ना काही पडत होतं, तो एक भाग होता. पुढे एक अपघात घडला. अक्कलकोट संस्थानशी भांडण केल्यामुळे, आमची जी थोडी जमीन होती, घर होतं त्याचा लिलाव झाला. माझे काका तुरुंगात गेले. त्या काळात जगणंही मुश्किल होऊन बसलं. जून १९३७ मधे माझे वडील मला पुण्याला घेऊन आले. 'शहाबाद स्टोन कंपनी' चे मालक, भगवंतराव बोर्डे, आरोळे अशा परिचितांच्या स्वाधीन मला करून ते निघून गेले. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल, नाना वाडा या शाळेत त्यांनी माझं नाव घातलं. या नव्या गावात नवव्या वर्षी माझी एकाकी भ्रमंती सुरू झाली. एकोणीसशे सदतीस सालचं पुणं, त्यावेळचा रडा, पिरपिरा पाऊस, चिखलानं माखलेले रस्ते, त्यातून शाळेत जाणं महाकर्मकठीण होतं. हे सारं सविस्तर सांगण्याचं कारण ते विषयाशी संबंधित असल्यानं सांगणं आवश्यक आहे. त्यावेळी मी वारावर जेवत असे. आज ते सांगून समजणार नाही. न्यू इंग्लिश स्कूल नानावाडा या शाळेच्या मागेच बिनीवाल्यांचा वाडा आहे. बिनीवाले हे स्वत: व्हायोलीन वाजवणारे होते. त्यांच्या वरच्या मजल्यावर विनायक महादेव तारकुंडे - जस्टिस तारकुंडे राहात होते. तिथेच शंकर केशव कानेटकर - कवी गिरीश. तारकुंड्यांकडे माझे वार होते. तारकुंडे यांचेकडे अधूनमधून मी राहात असे. तारकुंडे एकटे होते. ते आणि त्यांची बहीण इंदुमती हे राहात होते. त्यांचे बरोबर मी राहात होतो. त्या काळात हिंदमाता मंदिर हे बाळूकाका कानेटकरांचे वरती पत्रा असलेलं मोठं घर होतं. ते, त्यांची दोन मुले, मी असे सगळे सेनापती बापट यांचेबरोबर रस्ते झाडायला जात असू. त्यावेळीही गाणं म्हणण्याचं काम माझंच असे - काय गाणं होतं (गाऊन दाखवत) 'महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले, मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले' लोकांना स्वच्छता शिकवायची हा सेनापती बापटांचा उद्देश. सेनापती बापटांचा सहवास, त्यांचा मायेचा स्पर्श - नोबेल प्राईझइतकं मोठं प्राईझ मिळावं इतकं त्याचं मोल होतं.

माझं गाण्याचं शिक्षण शाळेतही चालू झालेलं होतं. अर्थातच ते परीक्षेचं गाणं होतं. नेने नावाचे शिक्षक होते. फार चांगले शिक्षक होते. त्यांनी आम्हांला शिकवलं (गात) 'नमन करू या प्रभुपदाला' किंवा मग (गात) लक्षणगीतं 'जनमन रमवी किती भैरवी, कोमल वादी ग संवादी...' हे गाणं. शाळेत आम्हाला गरीब विद्यार्थी म्हणून फ्रीशिप. शंकर केशव कानेटकर आमच्या कपड्याचा खर्च करीत. या साऱ्यात गाणं ऐकण्याची जी आतून ओढ होती ती कुठून आली हे माहीत नाही. ती वयाच्या सातव्या वर्षापासून होती. गाण्यांनी मला वेड लावलं. 'मी' या मी मधला मी थोडा लहान करून घ्या. 'मी च्या वेलांटीचा सुटो सुटो फास' असं विंदा करंदीकरांनी म्हटलेलं आहे. 'अहंकाराचा वारा न लागो राजसा' असंही सांगितलेलं आहे. 'मी हा शब्दच मजला न लगे' असं महाकवी केशवसुतांनी सांगून ठेवलेलं आहे. हे सगळं असलं तरी हे 'मी' चं जगणं आणि कलेची लागलेली ओढ हे महाभयंकर. त्याकाळात, विनायकराव पटवर्धनांचा जवळच क्लास होता.

तिथं ते शिकवत असत. ते नसताना त्यांचे शिष्य शिकवायचे. ते मी ऐकत बसायचो. यातून होता होता, प्रत्येक गायकाचं घर कुठे आहे, ते काय गातात याची ओढ मला लागली. एकोणीसशे सदोतीस ते एकोणीसशे एकेचाळीस मी पुण्यात वारानं जेवत होतो. एकोणीसशे छत्तीसच्या शेवटी अब्दुल करीम खाँ यांचं सोलापुरमधे शेवटचं गाणं झालं. मला त्यावेळी फारसं काही कळत नव्हतं. 'भगवा ब्रिज देखन को चलो री' ही बंदिश गायल्याचं थोडं स्मरण आहे. त्याच वेळी कुमार गंधर्व - वय वर्ष आठ - याचं गाणं सोलापुरात झालं ते मी ऐकायला गेलो होतो. आपल्याच वयाचा हा मुलगा किती छान गातो. आपल्याला असं काही गाणं का येत नाही - हे एकीकडे आणि एकीकडे जेवणाची पंचाईत अशा दोन रुळांवरून ही गाडी चालली होती. कुमारची त्यावेळेस झालेली ओळख त्यानंही ठेवली. लता मंगेशकरचंही गाणं त्यावेळी ऐकलं. विपन्नावस्थेत असलेल्या दीनानाथरावांची ती मैफिल - फारशी गर्दी नव्हती. त्यावेळी तिनं एक-दोन गाणी म्हटली. त्यावेळी थिएटर्सही ओस पडत होती. बालगंधर्वांची नाटकं हा माझा संगीताचा पिंड फुलवणारं सगळ्यात मोठं आकर्षण होतं. बालगंधर्वांचा सोलापुराशी निकटचा संबंध होता. त्यांच्या नाटक मंडळींचा मुक्काम सहा-सहा महिने सोलापुरात असायचा. मेकॅनिकी थिएटरधे त्यांची नाटकं होत. तिथं जवळच कंपनीचा मुक्काम असायचा. त्या कंपनीबरोबर सात-आठ म्हशी आगगाडीत घालून आणल्या जायच्या. सगळा संस्थानी कारभार होता. दर गुरुवारी नारायणराव बालगंधर्व भजन करीत असत. ते भजन कधीही बसून करीत नसत. ते उभं राहून भजन म्हणत. सोलापुरात नारायणरावांचे परमस्नेही माणिकचंद शहा नावाचे होते. दोघे दिसायला सारखे गोरे, बुटके, तेजस्वी डोळ्याचे - त्यांचा आणि नारायणरावांचा घनिष्ट संबंध होता. तिथं आमचीही येजा असायची त्यामुळं नेवरेकर, शिलेदार, रानडे, आठवले, भांडारकर म्हणून एक विनोदी नट होते, या साऱ्यांशी परीचय झाला. आठवड्यातून दोन प्रयोग होत. रात्री दहा ते सकाळी सहापर्यंत नाटकं चालत. नारायणरावांची नाटकातली गाणी खूप ऐकली. पण नारायणरावांच्या गाण्यांनी गुंता वाढत चालला . त्यावेळी एक गाणं मी सतत म्हणायचो. द्रौपदी मधलं गाणं (गातात) 'योग्य न प्रेम वर्णना' हे गाणं त्याकाळी लग्नाच्या मुली, दाखवण्याच्या कार्यक्रमात म्हणत. बाकी त्या काळात आम्ही काय गाणी ऐकत होतो? मुद्दाम सांगतो, त्यावेळी कानावर काय पडत होतं - 'सुनो सुनो बनके प्राणी' शांता आपटेचं 'वहाँ' मधलं गाणं. रत्नप्रभाचं 'भक्त प्रल्हाद' मधलं गाणं, ज्युथिका रे हिची दहा गाणी पाठ. 'बाबा मनकी आँखे खोल' सारखं गाणं - हे आमचं त्या काळातलं सांगीतिक जीवन होतं.

शास्त्रीय संगीताच्या संदर्भात बेचाळीस त्रेचाळीसच्या काळात वझेबुवांचंही गाणं मी पुण्यात ऐकलेलं मला आठवतंय. या आधीची सदतीस सालची गोष्ट सांगतो. सदतीस साली खाँ साहेब अब्दुल करीम खाँ साहेब गेले. फारच नाट्यपूर्ण असा त्यांचा शेवट झाला. ते मद्रासला निघाले होते. तिथून ते पाँडिचेरीला जाणार होते. मध्यरात्रीनंतर जे स्टेशन आलं तिथं खाँ साहेबांनी उतरायला सांगितलं. कुणीतरी त्यांना पाँडिचेरीला चाललो आहोत अशी आठवण दिली. तरी त्यांनी उतरायला सांगितलं. स्टेशनवर उतरून प्लॅटफॉर्मवर चादर पसरून त्यांनी प्रथम नमाज पडला. नंतर सूर द्या म्हणाले आणि गायला लागले (गातात.) 'करुणा क्यूँ ना आवे, अरे गोपाला, गोपाला, अरे गोपाला करुणा क्यूँ ना आवे' पण याबरोबरच त्यांचं देहावसान झालं. त्यांचा पिलू अगदी वेगळा जाणवतो. चार-साडेचार मिनिटांची रेकॉर्ड आपण ऐकली तर ती आपल्याला एक विलक्षण अनुभव देऊन जाते. ही रेकॉर्ड निघाली होती. मला याच काळात थोड्या नोकऱ्या मिळायल्या लागल्या होत्या. त्यांतली एक नोकरी हरिभाऊ साने या माझ्या शिक्षकांनी अंत्यविधीसाठी जे सामान लागतं त्या दुकानात लावून दिली. तिथला मुख्य फायदा म्हणजे रात्रभर कंदिलाच्या प्रकाशात वाचता यायचं. कवितेचीही ओढ लागलेली होती. माधव ज्युलियन यांच्याकडे जात होतो. त्यांचे पाय चेपत होतो. संघात गाणी म्हणत होतो, 'रणी फडकती लाखो झेंडे अरुणाचा अवतार पहा, विजयश्रीला श्रीविष्णुपरि भगवा झेंडा एकच हा' त्यावेळी सानेगुरुजींच्या कविता संघाला चालत होत्या. 'आम्ही मांडू निर्भय ठाण, देऊ हो प्राण' ही गाणी मी म्हटली. मी जी गाणी म्हटली ती सुधीर फडके यांनी म्हटली. तो पर्यंत ते संघात आले होते आणि मी सेवा दलात गेलो. संघात काय किंवा दलात काय गाण्याची ओढ कमीच. वसंत बापट आल्यानंतर 'महाराष्ट्र दर्शन' 'भारत दर्शन' यासारखे चांगले कार्यक्रम झाले. पण गाण्याची लगन ही वेगळीच असते हे आपण लक्षात घेतलं पाहिजे.

या काळात आम्ही गाण्याला जायला लागलो. म्हणजे हजेरी लावायला लागलो. क्वालिफाईड झालो. क्वालिफाईड म्हणजे आमंत्रण नसताना गाण्याला शिष्टपणे जाऊन बसणं. चाळीस, एक्केचाळीस, बेचाळीसच्या सुमाराला या महाराष्ट्राचं भाग्य असं थोर की, वीस-पंचवीस पहिल्या दर्जाचे गायक महाराष्ट्रात होते. ग्वालेर घराण्याचे नारायणराव व्यास, विनायकबुवा पटवर्धन, पं. ओंकारनाथ ठाकूर, त्यानंतर मास्तर कृष्णराव, गोविंदराव टेंबे यांची पेटी, नारायणराव बालगंधर्व यांचं भजन त्या भजनाच्या साथीला थिरखवाँ, जगन्नाथबुवा पंढरपुरकर, पहाडी आवाजाचे लोंढे, रामभाऊ कुंदगोळकर - रामभाऊंचं रेडिओवर मी गाणं ऐकलं होतं. त्यांचे ललत, तोडी हे राग आजही ऐकलेले स्मरतात पण त्यांचं प्रत्यक्ष गाणं मी त्यांच्याच एकसष्टीच्या निमित्तानं हिराबागेत वीस मिनिटं ऐकलं. 'हरिका भेद न पावो' - एकदाच त्यांचं गाणं मी प्रत्यक्ष ऐकलं. पूर्वी पुण्यात ठराविक ठिकाणी ठराविक गाणी होत. अहिल्यादेवी शाळेजवळ गंगूबाई हनगल यांचंच गाणं दरवर्षी व्हायचं. सुगंधी आळीत हिराबाई आणि सुरेशबाबू माने यांचं गाणं व्हायचं. शिवाजी मंदिरात नारायणराव व्यासांचंच गाणं व्हायचं. निंबाळकर तालमीजवळ लोंढ्यांचंच गाणं व्हायचं. पैसा न देता गाणं ऐकायला मिळणं ही एक पर्वणी होती. या साऱ्याचं माझ्यावरचं आजही इंप्रेशन कायम आहे. तीच माणसं त्याच ठिकाणी गायची इथपर्यंत ठीक आहे. पण तेच तेच गायची ही माझी तक्रार आहे. एकीकडे शिक्षण चालूच होतं. पुढे फर्गसनमधे गेलो. नोकरी चालूच होती. त्यावेळी मेडिकल कॉलेजसमोर सीएमए मधे नोकरीला लागलो. बासष्ट रुपये पगार. तीन महिन्यांत माझी अर्नाकुलम्ला बदली झाली. मोठी पंचाईत झाली. बासष्ट रुपये हे त्या काळी सूर्यचंद्राएवढे होते. तरी नोकरी सोडली. श्री. के. क्षीरसागरांच्या मदतीनं भावेस्कूलमधे शिक्षक म्हणून नोकरीला लागलो. गाण्याची ओढ आणि गायकांविषयीचं आकर्षण मला पुणं सोडू देत नव्हतं. ही नोकरी चालू असताना गाणी ऐकणं चालूच होतं. नारायणरावांचं गाणं,

विनायकबुवांचं गाणं, मास्तर कृष्णरावांचं गाणं - इतरांपेक्षा मास्तरांकडे माझं जाणं येणं लवकर वाढलं. माझा किंकर नावाचा मित्र होता, तो त्यांच्या घराजवळ राहायचा. मास्तरांचा स्वभाव भारी गोड. माझं वय बारा तेरा वर्षांचं. तेव्हापासूनच माझं मास्तरांकडे जाणंयेणं होतं. मास्तरांना मी विचारायचो, 'आता गाणं कुठंय' मास्तर सांगायचे 'अमूक ठिकाणी आहे पण तू येऊ नको. बिदागी कमी आहे त्यामुळे दोन आण्याचंच गाईन' पण मास्तर विद्वान, प्रतिभावान होते.

संगीताची पुस्तकं आम्हांला सांगतात की 'पॉझ' हवा 'पॉझ' महत्त्वाचा असतो. ते सौंदर्यलक्षण आहे. कारण ऐकणारे देखील त्या गाण्याच्या नादात असतात. ते तपासून बघत असतात. त्यांना येत नसलं तरी आपल्याशीच तपासत असतात. हा लेन देनचा कार्यक्रम आहे. गाणं ऐकणं म्हणजे भीमसेन जोशी यांचं गाणं आणि समोर श्रीराम पुजारी म्हणजे क्रिकेटच्या भाषेत थ्री स्लीप्स आणि गलीसारखं ठरलेलं - आपल्या गाण्यात ठराविकपणा होता. पन्नास सालापर्यंत उपज अंगानं गाणं फार थोडं होतं. गाणारे हिंडायला लागले. त्याच सुमारास या काळात रेकॉर्डस निघायला लागल्या - त्याला प्लेटी म्हणायचे. एक महत्त्वाची गोष्ट इथं सांगतो, या गाण्याच्या हिंदुस्थानी संगीताच्या प्रवासामधे एकोणीसशे त्रेचाळीस साल फार महत्त्वाचं - या पूर्वी संगीतात फार मोठी माणसं होती. फैयाज खाँ होते, अल्लादियाँ खाँ होते. अब्दुल करीम खाँ साहेब होते. हे आणि इतरही मोठी माणसं होती तरी अल्लादिया खाँ कोल्हापूरला राहायचे आणि अब्दुल करीम खाँ मिरजेला राहायचे. तीस मैलांच्या परिसरात दोघेही राहात होते. पण दोघेही एकमेकांचं गाणं ऐकायला एकदाही गेले नाहीत. आणि आपल्या शिष्यांना दुसऱ्याचं गाणं ऐकायला परवानगी देत नव्हते. शिष्य चोरून जायचे. ते सारं फार असंस्कृत होतं. मी आपल्याला त्रेचाळीस सालची गोष्ट सांगत होतो. त्रेचाळीस साली संगीतात मोठी उत्क्रांती झाली. एकोणीसशे त्रेचाळीस साली ऑल इंडिया रेडिओवर संगीत सभा झाली. विक्रम संवत्सराच्या दोन हजाराव्या संवत्सराच्या निमित्तानं आठ दिवसांची संगीत सभा मुंबईत सेंट झेवियरच्या मागे झाली. ती मी अथपासून इतिपर्यंत ऐकली. नुसती ऐकली असं नव्हे तर पहिल्यापासून - म्हणजे आत एका खोलीत गायक सूर लावत असेल तेथे घुसून तेथपासून शेपूट पकडायची. ते तेथे काय गातात, बाहेर काय गातात, बोलतात काय - त्या संगीत महोत्सवात दहा मोठ्या संगीतकारांचा जन्म झाला. त्या मैफिलीत विलायत खाँ साहेब, पं. रविशंकर, अली अकबर खाँ, बिस्मिल्ला खाँ, बडे गुलाम अली खाँ, तसेच मोठे तबलजी अनोखेलाल आणखी असेच दोन-तीन तबलजी, असे सारे, यांच्या मैफिली इतक्या गाजल्या की ते रात्री मधे प्रसिद्धीच्या झोतात आले. बडे गुलाम अली खाँ त्यापूर्वी मुंबईत गाऊन गेले होते. त्यांचं गाणं लोकांना नीटसं समजलं नाही, असं म्हणावं लागेल. आपण रसिक ठराविक पद्धतीनं गाणं ऐकतो. ती झापडं मोडून काढली पाहिजेत. त्या झापडांनी संगीताचा फार मोठा घात केलेला आहे. आपल्याला पाहिजे ते गायकाकडून गाऊन गेणं, यासारखं दुसरं पाप नाही. हे पुढे कसं घडलं, गायकांना आग्रह व्हायला लागला, 'अहो यमन म्हणा ना'. आपण लक्षात घ्यायला हवं की, कलावंत आपण आज काय मांडायचं ते ठरवून आलेला असतो. त्याला, त्याच्या विचाराला आपणच वाव द्यायला हवा. पुण्यातल्या मध्यमवर्गीय गाणं ऐकणाऱ्यांनी वसंतराव देशपांड्यांसारख्या गायकाचा घात केला. 'वसंतराव 'या भवनातील गा ना'. वसंतराव बुद्धिमान होते. त्याला काही वेगळं सांगायचं असेल, वेगळं मांडायचं असेल. पुढे त्याविषयी मी सांगेनच. आत्ता एवढंच सांगतो, एक ऐकणारा बुजुर्ग म्हणून सांगतो. नावानं गाणं ऐकू नका, गाण्यानं गाणं ऐका. 'रेडिओवर गाणं काय चाललंय? बंद करा बघू' असं ओरडणाऱ्याला आपण सांगितलं की, 'भीमसेन जोशी' गात आहेत तर लगेच प्रतिक्रिया काय मिळते - 'भीमसेन आहेत का? असू दे मग'. आपण असं गाणं ऐकतो. हे बरोबर नाही. एक लक्षात ठेवा, भारतीय संगीतामधे कोण केसरबाई केरकर, भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, अमीरखाँ? असतील, पण आज मैफिलीत वीस वर्षांचा मुलगा अगर मुलगी असं गाऊन जाईल - बुर्जुगांची पंचाईत करेल - हे भारतीय संगीताचे वैशिष्ट्य आहे. माझं जर काही योगदान असेल तर मी वीस वर्षांचा मुलाचं अगर मुलीचं गाणं केसरबाईचं गाणं ज्या तन्मयतेनं ऐकतो, त्याच तन्मयतेनं ऐकू शकतो. मी स्वत:ला एवढं मोकळं ठेवलेलं आहे, एवढाच माझा गुण.

त्रेचाळीस सालच्या त्या कॉन्फरन्समधे अनोखेलाल यांनी जो तबला वाजवला, त्या वेळी आम्ही तबला तबला म्हणत होतो त्याला तडा गेला. त्रेचाळीस सालची आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगतो. त्रेचाळीस साली त्याच कॉन्फरन्समध्ये मी अल्लादिया खाँ साहेबांचं वीस मिनिटांचं गाणं ऐकलं. त्यांचं त्यावेळी वय होतं पंच्याऐशीच्या आसपास. त्यांना उचलून स्टेजवर आणलं. त्यांचेमागे केसरबाई बसल्या होत्या. त्यांचे सुपुत्र बसले होते. सकाळची मैफल होती. त्यांचं गाणं मी ऐकलं म्हणजे तांत्रिक दृष्ट्या ऐकलं. त्यातली आवर्जून सांगण्याची गोष्ट अशी, ते गायले. संगीतातले गौरीशंकर असं त्यांना गोविंदराव टेंब्यांनी संबोधलं, ते गाणं संपवून आले. तेथे आग्रेवाल्यांची एक टोळी बसली होती. त्यांना अदबीनं बसवून ते म्हणाले, 'आवो बडेमियाँ, आप बहोत अच्छे गाए लेकिन कौनसा राग गाए' तो गायलेला राग कॉमनमधला कॉमन होता. 'आज राधे तोडे' म्हणून रामकलीमधली चीज होती. त्यांची मांडणी फक्त वेगळी होती. अल्लादिया खाँ हे बुद्धिमान आणि एका रागाची अनेक रूपं दाखवणारे. त्यांच्यासारखे गायक फार थोडे झाले. खाँ साहेब त्यांच्याकडे पाहून हसले. आग्रेवाल्यांनी विचारलं त्यात अपमान करण्याचा उद्देश नव्हता. पण तुम्ही गायलेला रामकली असा नाही असं त्यांना सांगायचं होतं. आम्ही जो रामकली गातो तोच बरोबर, हे त्यांना सांगायचं होतं.

पं. रविशंकर त्रेचाळीस नंतर पुण्याला आले. आमच्या स्वभावानुसार आम्ही त्यांचं शेपूट पकडलं. पुण्यात डब्ल्यू. एन. भट नावाचे फोटोग्राफर होते त्यांच्याकडे रविशंकर यांना आम्ही सतारीसकट घेऊन गेलो. त्यांनी रवीशंकरांचे चाळीस-पंचेचाळीस फोटो काढले. रविशंकरांनी त्यांच्याकडे लक्षही दिलं नाही. ते सतारीवर आलाप करीत बसले. त्या चाळीस फोटोंतून चव्वेचाळीस सालच्या मौजेच्या दिवाळी अंकात 'नादब्रह्म' म्हणून फोटो आलेला आहे.

थिरखवाँसाहेबांचा तबला पुण्यामधे फार वेळा व्हायचा. खर्च भयानक, त्यामानानं गवयाचं उत्पन्न कमी. महिना दोन महिने झाले की

थिरखवाँ लालजी गोखल्यांकडे  यायचे. लालजी पट्टशिष्य. सूर्यकांतही होता आणि आम्ही प्रेमी. कात्र्यांच्या घरी थिरखवांच्या मैफलीचे ते आयोजक आणि लेहरा धरायला वसंतराव देशपांडे. वसंता लेहरा धरून तयार आणि ती मैफल सुरू होणार इतक्यात एक हाफ शर्ट घातलेला धोतर नेसलेला गलितगात्र असा मनुष्य आला. गाण्याच्या मैफलीत हा मनुष्य कसा काय असं कुणीतरी विचारील अशी स्थिती. तो आल्यावर थिरखवाँ म्हणाले, 'अरे लौंडे तू आया क्या? बैठ'. आता आमच्या मनात प्रश्न उभा राहिला - थिरखवाँ साहेबांनी ज्याची विचारपूस करावी असा हा कोण? मी वसंताला विचारलं, 'वशा हा कोण आहे रे?' तो म्हणाला 'गप्प बैस?'. थिरखवाँसाहेब म्हणाले 'ये लौंडा पहले तबला बजाएगा, बाद में मै बजाऊंगा.' आम्हाला वाटलं, हा मरतुकडा काय तबला वाजवणार, याला ठेका तरी धरता येईल का? त्यांचं दोघांचं काही काळ चाललं होतं. 'खाँ साहेब गरिबाची का टिंगल करता.' खाँ साहेब म्हणाले, 'लौंडे तू पहले बजाएगा' आम्ही अवाक् होवून बघायला लागलो. वसंता काही सांगायला तयार नाही. मग त्या माणसानं दोन गुडघे जवळ घेतले आणि गुडघ्यांच्या वर तबला अगोदर लावायला लागला तो, तबल्यासारखे आवाज करायला लागला. बोटानं तबला वाजवतानाचा 'टाँग' असा आवाज काढल्यावर थिरखवाँ सांगायचे जरा चढाव. दोघांचा संवाद चाललेला असं करून त्या माणसानं पंधरा मिनिटं तोंडानं तबला वाजवला - तबल्याचे बोल नव्हे - तुम्ही पाहिलं नाही तर तबलाच वाजत आहे असं वाटेल. हे ऐकून अचंबित झालो. हा प्रसंग कुठंतरी लिहावा असं माझ्या मनात आहे. त्यानंतर थिरखवाँसाहेबाचं तबला वादन झालं. मध्यंतर झाल्याबरोबर मी वशाला विचारलं 'तो तोंडानं तबला वाजवणारा कोण रे?' वसंता त्याच्या खास शैलीत सानुनासिक आवाजात म्हणाला, 'अरे रामा हा माहीत नाही का तुला, तुझ्याच गावचा आहे.  हा नकलाकार पंडित. हा पंडित कुलवधू मधे ज्योत्स्नाबाईच्या बापाचं काम करतो, नकलाकार आहे त्यामुळं हा असा तबला वाजवतो.' म्हणजे अशी माणसंही महाराष्ट्रात होती.

संगीताच्या या प्रवासात हा जो काळ होता, या काळात या लोकांची गाणी ऐकायला मिळणं, त्यांचा सहवास मिळणं ही एक अद्भुत गोष्ट झाली आणि भावे स्कूलमधे शिक्षक म्हणून आल्यानंतर मी मागं वळून पाहिलंच नाही. मास्तरांची गाणी, भीमसेन जोशी सत्तेचाळीसच्या पुढे आले. त्याच्या आधी बसवराज राजगुरु पुण्यामधे तळ ठोकून होते. हिराबागेजवळ त्यांची एक खोली होती. सायकलवर ते जात. त्यांचा आवाज फार गोड होता. ही सगळी कर्नाटकातून आलेली मंडळी एकेक भावगीत म्हणायची. मल्लिकार्जुन मन्सूर, बसवराज राजगुरु सारे भावगीतं, नाट्यगीतं म्हणत. बसवराजचा आवाज गोड, तान सुंदर. इथं परत संगीताचा एक विचार सांगतो, ज्यांचं जे बलस्थान आहे त्याच्यावरच सगळा भर दिल्यामुळे, बाकीचे अवयव कमकुवत होऊन गेले. तान ज्याची चांगली ते ताना मारत बसले. याच्यात तीन मोठे बळी   पडले. एक देवासचे रजबअली इतकी तयार तान की दहाबारा मिनिटे आलाप केला की तानेचे सट्टे सुरू. सगळं तानमय. पैसे न देता गाण्याला यायचं आणि असं म्हणायचं बरोबर नाही हे! दुसरा राम मराठे, रामभाऊ एके काळी चांगलं गात होता. पँट घालून गाणं म्हणायला बसलेला पहिला जो मी माणूस पाहिला तो मनोहर बर्वे, त्याच्या मागे हे दोघे बसत. राम मराठे आणि सुरेश हळदणकर.

याच काळात हिराबाई बडोदेकर नावाची मोठी गायिका होऊन गेली. आपण तिला किती लवकर विसरलो. हिराबाई बडोदेकर आणि बालगंधर्व या दोन गायकांमुळे आपण गाणं ऐकायला लागलो. बालगंधर्वांच्या गाण्यांनी महाराष्ट्रात संगीताची बीजं रुजली गेलेली आहेत. बालगंधर्वांच्या रेकॉर्डस् निघाल्या. घरोघरी गेल्या. लोक नाटक पहायला लागले. संगीत ऐकणं हे तवायफी आहे असं म्हणणारे आता नाटकाला जाऊन बसायला लागले. त्यांनी आपली भूमी रुजली. त्यांनी पाणी घातलं. हिराबाईचं संगीताला फार मोठं योगदान आहे. सगळीकडे जाऊन गायचं, सगळ्यांशी नीट वागायचं, गायिकेनं वागावं कसं याचा आदर्श हिराबाई बडोदेकर या बाईंनी घालून दिलेला आहे. त्यांच्याकडे आमचं जाणं खूप वाढलेलं होतं. उस्मानखाँ सारख्या सतारियाची तिथंच गाठ पडली, चाळीस पन्नास वर्षांपूर्वी. अष्टमीच्या दिवशी गाणं असायचं. ऐकायला लोक आपणहून यायचे. हिराबाईंच्या बरोबरच आठवण होते ती सुरेशबाबू माने यांची. सुरेशबाबू म्हणजे माझ्या गाण्याच्या धनातला सुवर्णकणच त्याविषयी अधिक उद्या. आता इथंच थांबतो.